# तंत्रशिक्षण विभागीय कार्यालय, औरंगाबाद

(ISO 9001:2008 प्रमाणित)

पत्र पेटी क्र -५१६ औरंगाबाद - ४३१ ००५

(०२४०)२३३४२१६(P) २३३४७६९(O) Fax-२३५६८२०

website : http://www.dteau.org email : roaurangabad@dtemaharashtra.gov.in


जाक्र/विकाऔ/शिक्षण/२०१९/ 1655

दिनांक :- 28 MAY 2019

प्रति,

**संचालक/प्राचार्य,**

तंत्रशिक्षण संचालनालयाच्या अखत्यारीतील,

औरंगाबाद विभागातील सर्व संस्था.

**विषय :** - शैक्षणिक वर्ष २०१८-१९ मधील महाडीबीटी पोर्टलमार्फत शासनाच्या विविध शिष्यवृत्ती योजना प्रभावीपणे राबविण्या व लाभ जलद गतीने प्राप्त होण्यासाठी संस्थांना प्रशिक्षण देण्याबाबत...

संदर्भ : १ शैक्षणिक वर्ष २०१८-१९ करिता विविध योजनांतर्गत महाडीबीटी पोर्टलवर भरलेले व मंजूर करण्यात आलेले अर्ज.

२ मा. संचालक, तंत्रशिक्षण संचालनालय, म.रा.,मुंबई यांचे दिनांक १५/०५/२०१९ चे पत्र.

उपरोक्त विषय व संदर्भानुसार २०१८-१९ मध्ये महाडीबीटी पोर्टलमार्फत राबविण्यात येत असलेल्या विविध शिष्यवृत्ती योजनांचे लाभ जलद गतीने प्राप्त होण्यासाठी या कार्यालयाच्या अखत्यारीतील सर्व तंत्रशिक्षण संस्थामधील उपरोक्त शिष्यवृत्ती योजनांचे काम पहाणारे अधिकारी/कर्मचारी यांचेसाठी १ दिवसाचे प्रशिक्षण दिनांक ०६ जून २०१९ रोजी सकाळी ११.०० वाजता शासकीय अभियांत्रिकी महाविद्यालय, औरंगाबाद येथील मुख्य प्रेक्षागृह येथे आयोजित करण्यात आलेले आहे. सदर प्रशिक्षणासाठी महाऑनलाईनचे प्रतिनिधी उपस्थित राहून संस्था तसेच शासनाच्या विविध शिष्यवृत्ती योजनांचे लाभ देणारे विभाग (जसे की, सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभाग, विमुक्त जाती, भटक्या जमाती, इतर मागास वर्ग व विशेष मागास प्रवर्ग कल्याण विभाग, आदिवासी विकास विभाग) यांचे संबधित अधिकारी यांना विद्यार्थ्यांचे ऑनलाईन शिष्यवृत्ती मंजूरीनंतर संस्थांसाठी येत असलेल्या तांत्रिक अडचणी व इतर अडचणी समजून घेऊन त्यांचे शक्य तितक्या लवकर निवारण करणार आहेत. संस्थांना विद्यार्थ्यांचे अर्ज मंजुरीनंतर शिष्यवृत्ती योजनांचे लाभ मिळण्यामध्ये येणाऱ्या योजनांनिहाय तांत्रिक अडचणी संस्थेच्या लॉगीनमधून दिनांक ३ जून २०१९ पर्यंत सविस्तरपणे नमूद कराव्यात जेणेकरुन प्रशिक्षणाच्या दिवशी त्यांचे निवारण केले जाईल

(महेश शिवणकर)

प्र.सहसंचालक

तंत्रशिक्षण विभागीय कार्यालय, औरंगाबाद

प्रत:-

१ मा. संचालक, तंत्रशिक्षण संचालनालय, म.रा.,मुंबई (का.क्र. १८) यांना माहितीस्तव सविनय सादर.

२ मा. व्यवस्थापक, महाऑनलाईन लिमिटेड, पाचवा मजला, ट्रेंड वर्ल्ड, डी विंग कमला सिटी, सेनापती बापट रोड, लोअर परेल मुंबई -४०० ०१३ यांना विनंती करण्यात येते की दिनांक ६ जून २०१९ रोजी प्रशिक्षण देण्यासाठी त्यांचे प्रतिनिधीची प्रतिनियुक्ती करावी.

३ मा. आयुक्त, समाज कल्याण आयुक्तालय, म.रा., ३ चर्च रोड, पुणे ४११ ००१ यांना माहितीस्तव सविनय सादर.

४ मा. संचालक, विमुक्त जाती भटक्या जमाती इतर मागास वर्ग व विशेष मागास प्रवर्ग कल्याण संचालनालय, ३ चर्च रोड, पुणे-४११ ००१ यांना माहितीस्तव सविनय सादर.

५ मा. विभागीय आयुक्त, जिल्हा समाज कल्याण कार्यालय, डॉ. बाबासाहेब आंबेडकर सामाजिक न्याय भवन, खोकडपूरा, शिवाजी हायस्कुल बाजूला, औरंगाबाद यांना माहितीस्तव सादर.

६ मा. जिल्हा व्यवस्थापक, विमुक्त जाती भटक्या जमाती इतर मागास वर्ग व विशेष मागास प्रवर्ग कल्याण संचालनालय, डॉ. बाबासाहेब आंबेडकर सामाजिक न्याय भवन, खोकडपूरा, शिवाजी हायस्कुल बाजूला, औरंगाबाद यांना माहितीस्तव सादर.

७ प्रकल्प अधिकारी, आदिवासी विकास विभाग प्रकल्प कार्यालय, आजाद चौक ते टी. व्ही. सेंटर रोड, सेक्टर नंबर, डी-१ ओरींएट टॉवर, सिडको एन-८ औरंगाबाद यांना माहितीस्तव.

**उपरोक्त क्र. ३ ते ७ यांना विनंती करण्यात येते की, सदर प्रशिक्षणासाठी त्यांचे कार्यालयातील संबंधित अधिकारी/ कर्मचारी त्यांना येत असलेल्या तांत्रिक अडचणीच्या माहितीसह पाठविण्यात यावे.**